SPECIAL OFFERS
ई-पेपर वेबसाईट बनवा
फक्त २९९९/-
SAVE UP TO 90%
NEWS
9359421909
ONLY THIS WEEK!
ORDER NOW
www.abhibee.com

दैनिक
# आरंभपर्व
आरंभ एका नव्या पर्वाचा
Epaper : www.aparv.com

**1,22,570**
डिजिटल प्रतींचे दररोज सोशल मीडियाच्या माध्यमातून वितरण होणारे
पुण्यातील लोकप्रिय दैनिक



● वर्ष : ०१ ● अंक : ३०४ ● शुक्रवार, दि. ३० ऑगस्ट २०२४ ● टी.सी.नं. - एमएएचएमआर५२३२५ ● एसडीएम नं. - एसडीएम/एसआर.६०/२०२३ ● पुणे ● मराठी दैनिक (रविवार सोडून) ● पाने ४ ● किंमत : २ रूपये
● Volum : 1 ● Issue : 304 ● Friday, 30 August 2024 ● Title Code. - MAHMAR52325 ● SDM No. SDM/SR/60/2023 ● Pune ● Marathi Dainik (Monday To Saturday) ● Page : 4 ● Price : 2 Rs/-





# छत्रपती शिवाजी महाराज पुतळा, राजकारण आणि काही प्रश्न

या घटनेमध्ये दोषी असणाऱ्यांवर कठोर कारवाई झाली पाहिजे. ह्या घटनेनंतर महाराष्ट्रात अत्यंत गलिच्छ राजकारण सुरु झालं. राजकारणातले तथाकथित 'शिवप्रेमी' जागे होऊन 'खडे बोल', 'बोचणारी टीका', 'घणाघात' वगैरे करु लागले. ह्या राजकारण्यांची वक्तव्ये ऐकून कोणाला वाटेल की शिवाजी महाराजांवर ह्यांची काय अपरंपार भक्ती आहे ! ह्या निमित्ताने काही प्रश्न विचारावेसे वाटतात आणि काही आठवणींना उजाळा द्यावासा वाटतो :

1. राजकीय स्वातंत्र्य प्राप्त झालेल्या भारताचे पहिले पंतप्रधान जवाहरलाल नेहरु ज्यांना त्यांचे अंधभक्त सृष्टीच्या उत्पत्तीचे जनक मानतात त्यांनी आपल्या Discovery of India ह्या ग्रंथात (जो ग्रंथ ह्या भक्तांना 'पवित्र ग्रंथ' वाटतो) शिवाजी महाराजांवर निराधार वक्तव्य केली आहेत. पुढे जाऊन प्रतापगडावरील शिवाजी महाराजांच्या पुतळ्याचे अनावरण नेहरुंच्या हस्ते झालं. "बचपन से शिवाजी महाराज मेरे दिल में ऊंचा दर्जा रखते थे" असं म्हणत जवाहरलाल नेहरुंनी प्रतापगडावरील भाषणाची सुरुवात केलेली. मुळात प्रतापगडावरील शिवछत्रपतींच्या अश्वारुढ पुतळ्याचे अनावरण नेहरुंच्या हस्ते झालं ह्याला कारण Discovery of India आहे. गोष्ट इथे संपत नाही. ह्या कार्यक्रमाच्या समालोचनात एक वाक्य आहे - "एक महान व्यक्ति दुसरे महान व्यक्ति का सम्मान करते हुएँ" - हे वाक्य उच्चारताना लाज कशी वाटली नाही ? हा छत्रपतींचा अपमान होत नाही ?




2. मध्यप्रदेश मधल्या छिंदवाडा येथे फेब्रुवारी 2020 मध्ये काँग्रेसच्या कमलनाथ सरकार ने 'JCB' चा वापर करुन शिवाजी महाराजांचा पुतळा पाडण्यात आला. तेव्हा, आत्ताचा कुठलाही शिवप्रेमी जागा झाला नव्हता. कारण तेव्हा महाविकास आघाडीचं सरकार मुंबईत JCB वापरुन 'उखाड दिया' च्या बाता मारण्यात मश्गुल होतं.

3. विशाळगडावरच्या अतिक्रमणाबद्दल आजचे हे राजकीय शिवप्रेमी का गप्प होते ? तेव्हा गप्प राहणं सोयीचं असतं; कारण तिथे व्होट बँक आड येते. जेव्हा कोल्हापूरचे खासदार शाहू महाराज विशाळगडावर गेले तेव्हा अतिक्रमण हटवणाऱ्या लोकांना ते 'अतिरेकी' म्हणाले. अतिक्रमण करणारे अतिरेकी नाहीत का हो ?

4. कोरेगाव भीमा दंगली होण्याच्या आधी एल्गार परिषदेला विकायला ठेवलेल्या पुस्तकांपैकी एका पुस्तकाचं शीर्षक पहा - " शिवाजीचे उदात्तीकरण - पडद्याआडचे वास्तव " आजच्या ह्या राजकीय शिवप्रेमींनी ह्यावर काय प्रतिक्रिया दिली ? एल्गार परिषद आणि कोरेगाव भीमामध्ये जे घडलं त्याच्या तपासाला वेगळं वळण देऊन लोकांच्या मनात संभ्रम निर्माण करण्यासाठी कोणाला SIT बसवायची होती ?

5. आजवर महाराष्ट्रात संभाजी ब्रिगेड नामक संस्थेने शिवाजी महाराजांचा खोटा इतिहास पसरवण्यात मोठी भूमिका बजावली आहे. त्याला आपण पिवळी पुस्तकं म्हणतो. संभाजी ब्रिगेडला कोणाचा पाठिंबा आहे हे सांगायला नको. संभाजी ब्रिगेडची 'तुतारी' कोण वाजवतात हे आख्ख्या महाराष्ट्राला माहीत आहे. छत्रपती शिवाजी महाराज ह्यांच्या नावाचा वापर एक 'political tool' म्हणून होतो हे खेदजनक आहे. छत्रपतींनी निर्माण केलेले दुर्ग आणि त्यांचं संवर्धन होण्याकरिता कुठलाही राजकीय शिवप्रेमी कधीही काही बोलत नाही. गडांवर होणाऱ्या अतिक्रमणाबद्दल हाच राजकीय शिवप्रेमी गप्प बसून राहतो. गलिच्छ राजकारण थांबवा आणि शिवछत्रपतींचे गुण अंगिकारता येतील का ते बघा. त्यासाठी समर्थ रामदास स्वामींचे साहित्य वाचा. होय तेच रामदास स्वामी ज्यांचं अस्तित्व हे राजकीय शिवप्रेमी नेहमी नाकारतात !

# नवनाथ पारगे युवा मंच तर्फे शालेय विद्यार्थ्यांना छत्री वाटप

## 15 हजार विद्यार्थ्यांना वाटप होणार

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

नवनाथदादा पारगे युवा मंचच्या वतीने खडकवासला विधानसभा मतदारसंघातील 15हजार विद्यार्थ्यांना छत्री वटप करण्यात येणार आहे. वारजे माळवाडी येथील स्मिता पाटील विद्या मंदिर, कै.शामराव बराटे विद्यामंदिर, रामचंद्र चौधरी शाळा येथील विद्यार्थ्यांना छत्री वाटप करुन प्रारंभ करण्यात आला. हा कार्यक्रम मोठ्या उत्साहात संपन्न झाला. यावेळी आयोजक माजी जिल्हा परिषद सदस्य नवनाथ पारगे खडकवासला राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्रजी पवार पक्षाचे अध्यक्ष काकासाहेब चव्हाण, खडकवासला कार्याध्यक्ष सुरेश आण्णा गुजर, खडकवासला ग्रामीणचे अध्यक्ष त्रिंबक अण्णा मोकाशी, माजी नगरसेवक बाळाभाऊ धनकवडे, पुणे जिल्हा परिषदेच्या माजी सभापती पूजाताई पारगे, राष्ट्रीय काँग्रेसचे खडकवासला अध्यक्ष सचिन बराटे, सामाजिक कार्यकर्ते दत्ताभाऊ झंजे, तंटामुक्ती अध्यक्ष शरद अण्णा पारगे, उपसरपंच अश्विनीताई पारगे, योगेश पारगे, अतुल पारगे, माजी उपसरपंच बाळासाहेब पायगुडे, मारुती उर्फ बबलूशेठ कंक, माजी उपसरपंच रोहिदास गोगावले, व महाविकास आघाडीचे व नवनाथदादा पारगे युवा मंचचे सर्व कार्यकर्ते पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### अन्यायाविरुद्ध तुमच्या सोबत मी असेल

विद्यार्थ्यांना आपल्यावर कुठल्याही प्रकारचा अन्याय झाला तर मला कॉल करा तुमचा भाऊ म्हणून मी सर्वात आधी तुमच्या मदतीला असेल. माझ्यावर काय कारवाई होऊ व्हायची ते होऊ द्या, मात्र महिला भगिनींसाठी माझा पक्ष व मी निश्चित सुरक्षेचे हमी देतो.असे माजी जिल्हा परिषद सदस्य नवनाथ पारगे यांनी सांगितले.

- नवनाथ पारगे



# सिंहगडावर केला सरकारचा कडेलोट

- राजकोट किल्ल्यावरील छत्रपतीं शिवरायांचा पुतळा कोसळल्याने शिवसैनिक संतापले

**पुणे-लक्ष्मण साबळे (दै. आरंभ पर्व)**

मालवण येथील राजकोट किल्ल्यावरील छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा कोसळण्याच्या घटनेमूळे शिवसैनिक भयंकर संतापले आहेत.ह्यां घटनेच्या निषेधार्थ शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) खडकवासला मतदारसंघांच्या वतीने सिंहगड किल्ल्यावर राज्य शासन आणि संबंधित ठेकेदार यांच्या विरोधात निषेधात आंदोलन करण्यात आले.




खडकवासला विधानसभा मतदारसंघांतील शिवसैनिकांनी एकत्र येतं सरकारच्या प्रतिकात्मक पुतळ्याचा कडेलोट करण्यात आला. यावेळी इतकी मोठी वाईट घटना होऊन देखील त्याच्यावरती अतिशय बालिश पद्धतीने स्टेटमेंट देणाऱ्या राज्य शासनातील जबाबदार मंत्री यांचा निषेध करत महाराष्ट्रातील 14 कोटी जनतेचा अपमान झाल्या प्रकरणी त्याचप्रमाणे छत्रपती शिवरायांचा अवमान झाल्याप्रकरणी किमान पक्षी माफी ही मागण्याची दानत दाखवावी असे मत युवासेना जिल्हाप्रमुख निवडणुक समन्वयक सचिन पासलकर यांनी व्यक्त केले. तसेच येणाऱ्या काळात भ्रष्टाचारी सरकारचा जनताच कडेलोट करेल असा विश्वास जिल्हासंघटक बुवा खाटपे यांनी व्यक्त केला. यावेळी येत्या काळात सरकारच्या गलथान कारभाराविरोधात शिवसेनेकडून तीव्र आंदोलन करण्यात येईल असा इशारा उपजिल्हाप्रमुख रवी मुजुमले व माजी हवेली तालुकाप्रमुख संदीप मते यांनी दिला.

याप्रसंगी शहरसंघटक संतोष गोपाळ, माजी पंचायत समिती सदस्य पोपटतात्या चोरगे,नाना मरगळे,दीपक खिरीड,विनायक अप्पा नलावडे,निवृत्ती वाव्हळ,प्रदीप दोडके,आकाश यादव, सागर जावळकर व अनेक शिवसैनिक उपस्थित होते.

# 'अहो विक्रमार्का' चित्रपट पाच भाषांमध्ये प्रदर्शित

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

दाक्षिणात्य सुपस्टार देव गिल 'अहो विक्रमार्का'च्या निमित्ताने मराठी चित्रपटसृष्टीत पदार्पण करतो आहे. पुण्यातील उद्योजक मिहिर कुलकर्णी यांनी निर्मित केलेला हा दुसरा चित्रपट असून याआधी त्यांनी अ ब क या मराठी चित्रपटाची निर्मिती हिंदी चित्रपट सृष्टीतील सुनील शेट्टी आणि तमन्ना भाटिया यांना घेऊन केली होती. 'अहो विक्रमार्का' या चित्रपटातील अर्चना या गीताचे प्रसारण नुकतेच मिहीर कुलकर्णी यांच्या बिबेवाडी येथील ग्रॅव्हिटी जिम येथे करण्यात आले. यावेळी देव गिल आणि चित्रपटाचे सहनिर्माते अश्विनी कुमार मिश्रा उपस्थित होते. अभिनेता देवगिरी यांच्या पत्नी आरती देवेंदर गिल यादेखील चित्रपटाच्या सहनिर्मात्या आहेत.



# सचिन दोडके यांची विधानसभेच्या रणधुमाळीत एन्ट्री

**(दै. आरंभ पर्व)**

मागील विधानसभा निवडणुकीमध्ये नवख्या उमेदवार असतानाही भाजपाचें उमेदवार आमदार भीमराव तापकीर यांना तगडी फाईट देणारे माजी नगरसेवक सचिन दोडके हे पुन्हा सक्रिय झालेत.

आता ध्येय गाठायचे म्हणत सचिन दोडके यांनी गाठीभेटीने विधानसभा रणधुमाळीत संवादमय प्रवास सुरु केला आहे. खडकवासला विधानसभा मतदारसंघांमध्ये भारतीय जनता पार्टी व राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार यांच्यामध्ये आतापर्यंत जोरदार लढती रंगल्या आहेत.


मात्र सर्व निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीला यश मिळवता आलेले नाही.2019 साली सचिन दोडके यांनी तगडी फाईट देतं सर्वांना आश्चर्याचा धक्का दिला. त्यामुळे त्यांचे 2024 ला विधानसभा लढवणे हा अधिकार असल्याचं कार्यकर्त्यांचे म्हणणं आहे.



यंदा सर्व पक्षांमध्ये इच्छुकांची संख्या वाढली आहे. त्यामुळे कोणाचे तिकीट कोणाला मिळणार हे निश्चित नसतानाही इच्छुकांनी जोरदार मोर्चेबांधणी सुरु केली आहे.

राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाकडून सचिन दोडके यांच्यासोबत पक्षाचे विधानसभा अध्यक्ष काकासाहेब चव्हाण,माजी नगरसेवक बाळाभाऊ धनकवडे,माजी जिल्हा परिषद सदस्य नवनाथ पारगे हेही इच्छुक आहेत.

या तगड्या मातब्बर नेत्यापैकी कोणाला उमेदवारी मिळणार याविषयी तर्कवितर्क लावले जात आहेत. या सर्व घडामोडी घडत असताना सचिन दोडके हे काहीशा शांत भूमिकेत राहिल्याने त्यांच्याविषयी सर्वांना उत्सुकता होती.



मात्र एकता नगरीमध्ये पूर आल्यानंतर त्यांनी अत्यंत जबाबदारपणे या भागामध्ये संचार करतं पूरग्रस्तांना मदत केली. सर्वत्र इच्छुकांचे बॅनर झळकत असताना सचिन दोडके हे शांत असल्याने त्यांच्या मनात काय चाललंय आज अंदाज कोणाला येत नव्हता. आपल्या कामाकडे लक्ष केंद्रित केले.

अखेर सचिन दोडके हे सक्रिय झाले असल्याचें दिसून येत आहे. मतदारसंघातील सर्व भागांमध्ये सोसायटी यामध्ये गाठीभेटी वरती ते जोर देत आहेत. त्यामुळे ते विधानसभा निवडणूक लढवणार असल्याचे स्पष्ट संकेत मिळतं आहेत. गेल्या विधानसभा वेळी हाता तोंडाशी आलेला विजय त्यांच्या हातून निसटल्याची त्यांच्या कार्यकर्त्यांना खंत लागून राहिली आहे.

त्यामुळे यंदा सचिन दोडके हे आमदार होणारच ह्यां आवेशाने त्यांचे सर्व कार्यकर्ते कामाला लागले आहेत. संपूर्ण मतदारसंघात मागील विधानसभा निवडणुकीमध्ये सचिन दोडके हे घराघरात पोहोचले असल्याने भारतीय जनता पार्टीला ते जड जाण्याची शक्यता नाकारता येत नाही. उमेदवारीची खात्री असल्यानेच ते मैदानात उतरत असल्याची कुजबूज होतं आहे. उमेदवारीसाठी मोठी तगडी स्पर्धा निश्चित आआहे.त्यांच्याकडे संपूर्ण मतदारसंघाचें लक्ष असणार आहे.आगामी काळातील घडामोडीकडे सर्वच पक्षातील नेतेही लक्ष ठेऊन आहेत.

राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाकडून मी इच्छुक आहेे.उमेदवारी मला मिळणार याबाबत पूर्णपणे खात्री आहेे. या मतदारसंघांमध्ये गेले अनेक वर्षापासून काम करत आहे. मतदारसंघातील अनेक कार्यकर्त्यांची कामे करण्याकडे माझा भर आहे. या विधानसभा निवडणुकीत पक्षाचा महाविकास आघाडीचा आमदार होणे हे गरजेचे आहे .मतदारसंघांच्या विकासाकडे आपला कल कायम असणार आहेे.राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरदचंद्र पवार खासदार सुप्रियाताई सुळे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांच्यापर्यंत आपल्या कामाची पोहच आहे.ते देतील त्यां निर्णयाप्रमाणे आपण विधानसभेचे काम करणार आहोत.

सचिन दोडके, माजी नगरसेवक, विधानसभेचे इच्छुक उमेदवार राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार

# थोडक्यात



## पूरग्रस्त वाहनांना नुकसान भरपाई द्या : मनसेची मागणी

**पुणे (आरंभ पर्व) :** पुण्यातील आनंद नगर एकता नगर निंबजनगर येथील झालेल्या पुरामुळे झालेल्या परिस्थितीमध्ये अनेक सोसायटी धारकांची वाहने पाण्यात बुडून त्या वाहनांचे प्रचंड असं नुकसान झाले आहे . त्या वाहनांना इन्शुरन्स असतानाही इन्शुरन्स कंपन्यांनी इन्शुरन्स देण्यास नकार दिला आहे त्याना नुकसान भरपाई द्या अशी मागणी मनसे नेते गणेश आप्पा सातपुते, शिवाजी मते पाटील मनसे वाहतूक सेना शहराध्यक्ष यांनी जिल्हाधिकारी डॉ.सुहास दिवसे यांच्याकडे केली आहे. ह्यां संदर्भात मनसे अध्यक्ष राजसाहेब ठाकरे यांच्या सूचनेनुसार मा.जिल्हाधिकारी यांची भेट घेऊन मागणीचे निवेदन देण्यात आले. सदरच्या इन्शुरन्स कंपन्यांना नोटीसा काढून पूरग्रस्त भागातील अनेक वाहनांचे नुकसान झाले आहे त्या वाहनचालकांना नुकसान भरपाई देण्यासाठी इन्शुरन्स कंपन्यांना आदेश काढणार आहेत. त्यासाठी पूरग्रस्त भागातील नागरिकांकडून कागदपत्रांची पूर्तता होणे गरजेचे आहे. पूरग्रस्त आनंदनगर भागातील नागरिकांनी रहिवाशांनी कागदपत्राची पूर्तता करावी यासाठी लवकरच पूरग्रस्तां साठीची मीटिंग आयोजित करण्यात येईल व त्याची वेळ लवकरच आपणास कळविण्यात येईल.असे जिल्हाअधिकाऱ्यांनी यावेळी सांगितले.पूरग्रस्त भागातील वाहनांच्या संबंधितचा चांगला विषय मनसेने मांडल्यामुळे त्यांचे पूरग्रस्तांनी आभार मानले.

## भाजपच्या प्रसन्न दादांच्या बॅनरच्या रिक्षांची चर्चा




**पुणे (आरंभ पर्व) :** खडकवासला विधानसभा मतदारसंघांमध्ये राजकीय रंग चढू लागला आहे. अशातच भारतीय जनता पार्टीकडून इच्छुक उमेदवार असलेले माजी उपमहापौर अॅड.प्रसन्नदादा जगताप यांचें यांचे विधानसभेच्या मोर्चेबांधणीचें बॅनर असलेल्या रीक्षांची खडकवासला मतदारसंघात चर्चा होत आहे. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार अंदाजे 5 हजार बॅनर असलेले रिक्षा फिरत असल्याची चर्चा आहे. मतदार संघातील सिंहगड रोड परिसर,धायरी, कात्रज ,नरे ,वडगाव,वारजे माळवाडी,आंबेगाव,खडकवासला ह्यां भागात ह्या रिक्षा प्रामुख्याने फिरत असल्याने जगताप यांची सर्वत्र चर्चा होत आहे. खडकवासला विधानसभा मतदारसंघांमध्ये सर्वाधिक इच्छुक असल्याने विधानसभा निवडणूक चुरशीची होणार असल्याचे संकेत मिळतं आहेत.हक्काचा माणूस अशी ओळख असलेले प्रसन्नदादा यांनी सध्यातरी चर्चेत एकप्रकारे आघाडी घेतल्याने हा एक विषय ठरत आहे. उमेदवारीच्या बाबतीत भारतीय जनता पार्टी काय निर्णय घेणार याकडे सर्वांच्या नजरा आहेत.

## धायरी सिंहगड रोड भागातील स्वच्छतागृहेच अस्वच्छ !



**पुणे - लक्ष्मण साबळे (आरंभ पर्व) :** पुणे महानगरपालिकेवर सध्या प्रशासक राज आहे.अनेक भौतिक सोयी सुविधांचा बोजवारा उडाला आहे. असाच प्रकार स्वच्छतागृह शौचालये यांच्या बाबतीत होत आहे. सिंहगड रोड ,धायरी ,या परिसरातील अनेक शौचालये स्वच्छतागृह ना दुरुस्त व अस्वच्छ अवस्थेत आहेत. अनेक शौचालय ही चॉकअप झाली आहेत.अनेक ठिकाणी दारूच्या बॉटलही आढळून येतं आहेत. त्यामध्ये जाण्याचेही लोकांना धजावत नाही आहे. महिलांच्या शौचालयाच्या बाबतीतही ही अशीच अवस्था आहे. तात्काळ साफसफाई करुन दुरुस्ती करण्याची गरज आहे.

*नागरिकांच्या आरोग्यावर परिणाम होऊ शकतो.स्वच्छतागृहे जर अस्वच्छ असतील तर नागरिकांच्या आरोग्याचे काय?पुणे मनपाने तात्काळ लक्ष देऊन दुरुस्ती करुन घ्यावी. अन्यथा मनसे स्टाईलने या समस्येसाठी प्रयत्न केले जातील.*

*- श्री शिवाजी मते पाटील, शहराध्यक्ष मनसे वाहतूक सेना पुणे*

**मातंग एकता आंदोलनच्या पुणे जिल्हा**

## सरचिटणीसपदी दिगंबर जोगदंड यांची निवड



**लोणी-काळभोर (दै. आरंभ पर्व)**

लोणी काळभोर येथील दिगंबर जोगदंड यांची मातंग एकता अंदोलनच्या पुणे जिल्हा सरचिटणीस पदी नियुक्ती करण्यात आली आहे. तसे नियुक्तीचे पत्र माजी गृहराज्यमंत्री रमेश बागवे व अविनाश बागवे यांच्या हस्ते देण्यात आले. दिगंबर जोगदंड हे लोणी-काळभोर येथील मातंग समाजाचे तडफदार नेतृत्व म्हणून ओळखले जाणारे कार्यकर्ते आहेत .लोकशाहीर आण्णाभाऊ साठे यांना भारतरत्न पुरस्कार प्रदान करण्यात यावा यासाठी पुणे ते मुंबई पायी पदयात्रा काढून पावसाळी अधिवेशनाचे लक्ष वेधणारा हा झुंजार कार्यकर्ता आहे. तसेच पुणे येथे समाज कल्याण आयुक्त कार्यालय या ठिकाणी आमरण उपोषण केले होते .तसेच मराठा समाजाला आरक्षण मिळावे म्हणून मराठा आंदोलनात सर्कीय भाग घेणारा कार्यकर्ता असुन सर्व समाजासाठी रात्रंदिवस झटणारा कार्यकर्ता अशी ओळख हवेली तालुक्यात आहे .समाजासाठी अहोरात्र काम करून न्यायनिवाडा करणारा हा कार्यकर्ता असून समाजामध्ये अतिशय मोलाचे योगदान दिगंबर जोगदंड यांचे आहे. तसेच दिगंबर जोगदंड यांनी निवडीनंतर म्हणाले की मातंग समाजातील विखुरलेल्या समाज बांधवांना एकत्र आणणार असल्याचे त्यांनी सांगितले निवडीनंतर सांगितले.

# पुणे जिल्हा कार्याध्यक्षपदी प्रा. सचिन माथेफोड

**लोणी काळभोर (दै. आरंभ पर्व)**

समाजामध्ये काम करत असताना पत्रकारांना अनेक अडचणी येतात,अशा अडचणींमध्ये पत्रकारांना मदत करणे गरजेचे असते तसेच पत्रकारांना संरक्षण कवच देण्याचे काम संघटनेच्या माध्यमातून करणार आहोत. जिल्ह्यातील पत्रकारांना शासकीय सेवा,सुविधा,योजनांचा लाभ मिळवून देण्याचा कायम माझा प्रयत्न राहील. तसेच पुणे जिल्ह्यामध्ये राज्य मराठी पत्रकार परिषदेची ताकद,सर्वांच्या सहकार्याने संघटना वाढीसाठी प्रयत्न करणार असल्याचे नवनिर्वाचित पुणे जिल्हा कार्याध्यक्ष हभप.



प्रा.सचिन माथेफोड महाराज यांनी यावेळी बोलताता सांगितले.नुकतीच राज्य मराठी पत्रकार परिषद,महाराष्ट्र प्रदेश या पत्रकार संघटनेच्या पुणे जिल्हा वरिष्ठ कार्याध्यक्षपदी दै.लोकमतचे पत्रकार हभप. प्रा.सचिन माथेफोड महाराज यांची निवड संघटनेचे संस्थापक ,केंद्रीय अध्यक्ष मधुसुदन कुलथे यांच्या नेतृत्वाखाली करण्यात आली. यावेळी ते बोलत होते .

राज्य मराठी पत्रकार परिषदेचे पच्छिम महाराष्ट्राचे अध्यक्ष विजय लोखंडे,पुणे विभागीय अध्यक्ष नितीन करडे,पुणे जिल्हाध्यक्ष सुनील भंडारे यांच्या हस्ते हभप. प्रा.सचिन माथेफोड यांना श्रीक्षेत्र थेऊर येथे चिंतामणी गणपती मंदिरात निवडीचे पत्र प्रदान करण्यात आले.

यावेळी थेऊर,चिंतामणी मंदिरात प्रथम हभप.प्रा.सचिन माथेफोड यांच्या हस्ते तर उपस्थित सर्व पदाधिकारी यांच्या हस्ते चिंतामणी गणपतीची आरती करण्यात आली.

याप्रसंगी पुणे जिल्हा वरिष्ठ कार्याध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल हभप.प्रा.सचिन माथेफोड यांचा सत्कार पत्रकार सचिन सुंबे, पत्रकार चंद्रकांत दुंडे, रॉयल मिडीयाचे पत्रकार गौरव कवडे ,मराठा महासंघाचे भाऊसाहेब जगताप,संघटनेचे पच्छिम महाराष्ट्र अध्यक्ष विजय लोखंडे,पुणे विभागीय अध्यक्ष नितीन करडे,पुणे जिल्हाध्यक्ष सुनील भंडारे यांच्या हस्ते पार पडला. संघटनेचे केंद्रीय अध्यक्ष मधुसूदन कुलथे,महासचिव पवन बैस,संचालक नगरे,तसेच जिल्ह्यातील अनेक पत्रकारांनी माथेफोड यांचे निवड झाल्याबद्दल अभिनंदन केले.

# पोक्सोमधील आरोपीस केले मुंढवा पोलिसांनी जेरबंद

**लोणी काळभोर (दै. आरंभ पर्व)**

शेजारी राहणाऱ्या मुलीस फुस लावुन जबरदस्तीने वारंवार शरिरीक संबध प्रस्थापित करून तिला गर्भवती करून या घटनेची कुठे वाच्यता केली तर तिच्या आई वडीलांची बदनामी करेल अशी धमकी देवुन फरार झालेले आरोपी मुंडवा पोलीस ठाण्यातील पोलिसांनी जेरबंद केले . भीमप्पा मडीवाळ वय 21 असे जेरबंद केलेल्या आरोपीचे नाव आहे. मार्च 2024 मध्ये पहिल्या आठवडयापासुन पिडीतेच्या घराशेजारी राहणारा भीमप्पा मडीवाळ वय 21 याने पिडीतेशी जबरदस्तीने शरीर संबंध प्रस्थापित केले होते . त्यानुसार मुंढवा पोलीस स्टेशन गु.र.नं.325/2024 भा.द.वि.कलम-376,376 (2) एन, 506 लैगिक गुन्हयापासुन बालकांचे संरक्षण कायदा 2012चे कलम 4,6,8,12 अन्वये पोक्सो कायद्याअंतर्गत बलात्काराचा गुन्हा दाखल करण्यात आला होता. दाखल गुन्ह्याचा तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक कल्पना सुरवसे यांचे कडे होता. आरोपी फरार झाला होता .या गुन्हयातील आरोपीचा शोध घेण्यासाठी वरिष्ठ पोलीस निरीक्षक, निळकंठ जगताप यांनी तपास पथकास योग्य त्या सुचना दिल्या. त्याअनुषंगाने मुंढवा पोलीस स्टेशन कडील तपास पथकाचे अधिकारी आर. व्ही. महानोर व तपास पथक अमंलदार हे आरोपीचा शोध घेत असताना सदर आरोपी हा कर्नाटक येथे पळुन गेला आहे. त्यानुसार तपास पथकाचे अधिकारी आर. व्ही. महानोर व अमंलदार हे आरोपीचा शोध घेत असताना पोलीस हवालदार विनोद साळुंके यांना त्यांच्या बातमीदार व तांत्रिक विश्लेषणाच्या आधारे बातमी मिळाली की आरोपी हा त्याच्या घरी आला आहे. त्यावरुन सहाय्यक पोलीस निरीक्षक आर व्ही महानोर व तपासपथकातील स्टाफ यांनी या आरोपीस ताब्यात घेवुन त्याचे नाव व पत्ता विचारला असता त्याने स्वतःचे नाव भीमप्पा चंदगिरी मडीवाळ वय 21 रा. श्रीकृष्ण सोसायटी जवळ पत्र्याचे झोपडी मध्ये वडबन, मुंढवा, पुणे. असे सांगितले. सदर गुन्हयाबाबत त्यास विचारणा केली असता सदरचा गुन्हा त्याने कबुल केल्याने त्यास पोलीस स्टेशन येथे आणुन दाखल गुन्ह्याच्या आधारे अटक करण्यात आली. पुढील तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक कल्पना सुरवसे या करीत आहेत. ही कामगिरी ही अप्पर पोलीस आयुक्त (पूर्व विभाग) मनोज पाटील, पोलीस उपाआयुक्त, आर. राजा, सहाय्यक पोलीस आयुक्त अश्विनी राख, वरिष्ठ पोलीस निरीक्षक निळकंठ जगताप, पोलीस निरीक्षक गुन्हे बाबासाहेब निकम यांच्या मार्गदर्शनाखाली तपासपथक प्रमुख आर.व्ही. महानोर सहाय्यक पोलीस निरीक्षक कल्पना सुरवसे , पोलीस अंमलदार राजु कदम, शिवाजी जाधव, विनोद साळुंखे, राहुल मोरे, योगेश गायकवाड, माने, धुमाळ, रासकर, सोनवणे यांनी केला आहे.






दैनिक आरंभ पर्व हे मालक, मुद्रक, प्रकाशक सुरेखा देवेंद्र मते यांनी श्रीराम आर्ट्स अँड प्रिंटिंग प्रेस मिळकत नं. 496, भाजी मंडई समोर, सिंहगड रोड, खडकवासला, हवेली, पुणे-411024 येथे छापून भाजी मंडल समोर, सिंहगड रोड, पुणे 411024 येथे प्रकाशित केले.
संपादक : सुरेखा देवेंद्र मते (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी.) प्रसिद्ध झालेल्या वृत्त व लेखांशी संपादक सहमत असतीलच असे नाही, न्यायालयीन क्षेत्र पुणे बंधनकारक : Email : aparvinfo@gmail.com

• ARAMBHA PARVA is a daily Newspaper, Printed, Published and Owned by Surekha Devendra Mate • Printed at Shreeram Arts and Printing Press Milkat No. 496, Bhaji Mandai Samor, Sinhagad Road, Khadakwasala, Haveli, Pune-411024 and Published at Opp. Baji Mandal, Sinhgad Road, Pune -411024. • Mobile No-7276314142 • Editor -Surekha Devendra Mate, (responsible for editorial content as per PRB Act) • E-mail-aparvinfo@gmail.com • Newspaper Legal Cases Will Be Settled in Pune Court.